
लोकमत

# विकास मिणचेकर मानसशास्त्र मंडळाचे प्रभारी अध्यक्ष नियुक्त

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : जयसिंगपूर येथील श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. विकास मिणचेकर यांची



शिवाजी विद्यापीठाच्या मानसशास्त्र अभ्यास मंडळाचे प्रभारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

कुलगुरूंच्या आदेशावरून पुढील आदेश होईपर्यंत प्रभारी अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आल्याचे पत्र उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांनी दिले आहे.

पुण्यनगरी

# विद्यापीठात आज उद्योग संवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात 'युनिव्हर्सिटी-इंडस्ट्री लिंकेजिस : एम्प्लॉएबिलिटी अँड आंत्रप्रिन्युअरशिप डेव्हलपमेंट' या विषयावर महत्त्वपूर्ण परिसंवादाचे आयोजन केले आहे. महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते १२ जून रोजी सकाळी १०.३० वाजता या परिसंवादाचे उद्घाटन होणार आहे, अशी माहिती विद्यापीठ व उद्योग संवाद केंद्राचे समन्वयक डॉ. एस. डी. डेळेकर आणि राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी दिली आहे. यामध्ये अभय देशपांडे (इन्फ्रास्ट्रक्चर), जयराज पाटील (कास्टिंग), मोहन जयकर (विधी सेवा), एम. सरनोबत (वस्त्रोद्योग), ओंकार गुणे (औषधनिर्माण), प्रीतम संघवी (प्लास्टिक), रवींद्र महाजन (ऑटोमोटिव्ह), संजय अरणके (प्रोडक्ट डिझाईन), सतीश डाकरे (अकौंटिंग), श्रेणिक घोडावत (एफएमसीजी), सचिन पाटील (माहिती तंत्रज्ञान) आणि उदय निरगूडकर (पत्रकारिता) हे तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

12 JUN 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पिकल बॉल खेळ शाळा, विद्यापीठात सुरू करू – रमेश बैस

## पिकल बॉल प्रदर्शनी सामन्याचे राज्यपालांच्या हस्ते उद्घाटन



**मुंबई** : पिकल बॉल क्रीडा प्रकार सर्व शाळांमध्ये सुरू करावा, या दृष्टीने आपण राज्याच्या क्रीडा मंत्र्यांना सूचना करू. तसेच विद्यापीठ स्तरावर देखील पिकल बॉल खेळाला चालना देण्यासाठी कुलगुरूंना सूचित करू, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले. पिकल खेळाच्या माध्यमातून भारताने एशियन स्पर्धा आणि ऑलिम्पिकमध्ये देशासाठी पदक प्राप्त करावे, अशी अपेक्षाही राज्यपालांनी व्यक्त केली.

फिटनेसच्या दृष्टीने लोकप्रिय होत असलेल्या पिकल बॉल खेळाच्या प्रदर्शनी सामन्याचे उद्घाटन राज्यपाल रमेश बैस यांनी रविवारी राजभवन येथे केले. यावेळी ऑल इंडिया पिकल बॉल असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू, संस्थापक संचालक सुनील वालावलकर, महासचिव चेतन सनील, कोषाध्यक्ष निखिल मथुरे, महाराष्ट्र पिकल बॉल असोसिएशनचे अध्यक्ष यशोधन देशमुख व मुंबई पिकल बॉल असोसिएशनचे अध्यक्ष अभिषेक सप्रे उपस्थित होते. दरम्यान, राज्यपालांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी सादर केलेले खेळाचे प्रात्यक्षिक पाहिले व उपस्थितांशी संवाद साधला.

### ६० देशांत पिकल बॉल खेळ लोकप्रिय – प्रभू

पिकल बॉल हा खेळ बॅडमिंटन, टेबल टेनिस व लॉन टेनिस यांचे मिश्रण आहे. आज ६० पेक्षा अधिक देशांत पिकल बॉल खेळ लोकप्रिय आहे. तसेच हा खेळ कोणत्याही वयोगटातील व्यक्तीला खेळता येतो, असे ऑल इंडिया पिकल बॉल असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद प्रभू यांनी सांगितले.

तरूण भारत

# पंडित नेहरूंच्या दूरदृष्टीमुळेच देश अन्न-धान्यात स्वयंपूर्ण

## ▪ डॉ. संजय कुबल यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशाला स्वतंत्र झाल्यानंतर तत्कालिन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी राबविलेल्या पंचवार्षिक योजनामुळे देश अन्न-धान्यात स्वयंपूर्ण झाला हे कोणालाही नजरेआड करता येणार नाही. नेहरुंनी दूरदृष्टी ठेवून काम करण्याला प्राधान्य दिले. त्या दुरदुष्टीमुळे भारत विकसिनशील देशांच्या यादीत अग्रभागी आला असे, प्रतिपादन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांनी केले.



शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेतील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते. 'महाराष्ट्राच्या संकल्पनेतील कृषी उद्योगाचे प्रारूप' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. राज्यशास्त्र विषयाअंतर्गत 'महाराष्ट्राची संकल्पना आणि लघु संशोधन प्रबंध सुलभ लेखन पद्धती' डॉ. कुबल यांनी व्याख्यानात मांडली. ते म्हणाले, भारत देश हा औद्योगिक क्रांती पूर्वीचा कृषी प्रधान देश होता. त्यावेळी संपूर्ण जग भारत देशावर अवलंबून होते. मात्र परकीय आक्रमणामुळे भारतीय शेतीवर दूरगामी परिणाम झाला. याला ब्रिटीशांचे धोरणही कारणीभूत ठरले. ब्रिटिशांनी नफा आपल्या देशात व खर्च भारतीय अर्थव्यवस्थेवर टाकला. प्रथम शेती, द्वितीय कारखानदारी आणि तृतीय सेवाक्षेत्र अशा पद्धतीने विकासाची वाढ केली असती तर कृषी धोरण वेगळे दिसले असते. शेतीकडे धार्मिक, सरकार, नोकरशाही दृष्टीकोनातून पाहिले जात असल्याने शेतकऱ्यांची पिळवणूक होत आहे. या पिळवणूकीमुळे शेतीचा विकास खुटला, असे डॉ. कुबल यांनी सांगितले. भविष्यात जर शेतीचा विकास खरोखरच वाढवायचा असेल तर मात्र पंडीत नेहरु यांच्याप्रमाणे पंचवार्षिक योजना आखून त्या तातडीने अंमलात आणाव्या लागतील, असेही डॉ. कुबल यांनी सांगितले. या कार्यशाळेत उपकुलसचिव डॉ. संजय कुबल, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे यांच्यासह विद्यार्थी, समन्वयक, सहाय्यक प्राध्यापक प्रशासकीय अधिकारी ऑनलाईन सहभागी झाले होते. डॉ. सुशांत माने यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सचिन भोसले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बबन पाटोळे यांनी आभार मानले.

तरूण भारत

# विद्यापीठात कथ्थक नृत्य कार्यशाळा संपन्न

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात मंगळवार दि. ६ व ७ रोजी कथ्थक नृत्यावर कार्यशाळा संपन्न झाली. या दोन दिवसीय कार्यशाळेमध्ये आगरतला येथील केंद्रीय विद्यापीठ त्रिपुरा संगीत अधिविभागाचे प्रमुख व जयपुर घराण्याचे प्रसिध्द कथ्थक नर्तक डॉ. अजयकुमार सवने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातील विद्यार्थ्यांबरोबरच यवतमाळ, इचलकरंजी, सांगली आदी भागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. डॉ. सवने यांनी विद्यार्थ्यांना गणेशपरण, तत्कार, गतनिकास, उठाण, कवित्त आदी कथ्थक नृत्यातील विविध प्रकार शिकविले. डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी प्रास्ताविक केले. डॉ. निखिल भगत यांनी आभार मानले. भाग्यश्री कालेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. यावेळी मोहिनी दिवाण, अशोक पाटील, विश्वास सुतार आणि विद्यार्थी उपस्थित होते.

तरूण भारत

# विद्यापीठात आज उद्योग संवादवृद्धी परिसंवादाचे आयोजन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठामध्ये सोमवार १२ जून रोजी 'युनिव्हर्सिटी–इंडस्ट्री लिंकेजिस : एम्प्लॉएबिलिटी अँड आंत्रप्रिन्युअरशीप डेव्हलपमेंट' हा विषय घेऊन एकदिवसीय उद्योग संवादवृद्धी परिसंवादाचे आयोजन केले जात आहे. महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत सकाळी साडेदहा परिसंवादाला सुरुवात केली जाणार आहे. विद्यापीठ आणि उद्योग यांच्यामधील संवाद वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने या परिसंवादाचे आयोजन केले आहे, अशी माहिती विद्यापीठ व उद्योग संवाद केंद्राचे समन्वयक डॉ. एस. डी. डेळेकर आणि राज्यपालनियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी दिली.

विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात होणाऱ्या या परिसंवादाला अभय देशपांडे (इन्फ्रास्ट्रक्चर), जंयराज पाटील (कास्टींग), मोहन जयकर (विधीसेवा), एम. सरनोबत (वस्त्रोद्योग), ओंकार गुणे (औषधनिर्माण), प्रितम संघवी (प्लास्टीक), रविंद्र महाजन (ऑटोमोटिव्ह), संजय अरणके (प्रोडक्ट डिझाईन), सतीश डाकरे (अकाऊंटिंग), श्रेणिक घोडावत (एफएमसीजी), सचिन पाटील (माहिती तंत्रज्ञान) आणि उदय निरगुडकर (पत्रकारिता) हे तज्ज्ञ सहभागी होणार आहेत.